# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३


जा.क्र.:मका/कार्यक्रम/२०१५-२०१६/८२० दिनांक : ७/५/२०१५

## परिपत्रक

**विषय :- कल्याणकारी कार्यक्रमांची कालबध्द वार्षिक कार्यक्रम सुची**

**संदर्भ :-** मका/कार्यक्रम/१३-१४/४१२ दि.२७/३/२०१४

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये कल्याणकारी कार्यक्रमाची मार्गदर्शक सुची दिनांक १/४/२०१४ पासून पुढील आदेश येईपर्यंत अमंलात आणण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

या परिपत्रकाव्दारे सर्व अधिकारी व कर्मचारी यानां कळविण्यात येते की, कल्याणकारी कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचीमध्ये बदल करण्यात येत असून केंद्रस्तर, गटस्तर, विभागस्तर व राज्यस्तरावर आयोजित करावयाचे कल्याणकारी कार्यक्रमांचे परिशिष्ट अ,ब,क,ड मध्ये दर्शविल्याप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात यावे.

राज्यस्तरीय भजन प्रशिक्षण शिबीर चालु वर्षापासून बंद करण्यात आलेले आहे. गट व राज्यस्तरीय भजन स्पर्धा असल्यामुळे त्या स्पर्धेमध्ये कलावंताना सहभागाची संधी उपलब्ध आहे.

राज्यस्तरीय समरगीत स्पर्धा व राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेमध्ये ५० टक्केच कामगार व कामगार कुटूंबियांचा सहभाग असल्यामुळे ही स्पर्धा बंद करण्यात आलेली आहे.

कामगार नाट्य महोत्सव अंतिम स्पर्धा व औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी नाट्य महोत्सव हे दोन महोत्सव स्वतंत्र घेण्यापेक्षा दोन्ही मिळूण एक मोठ्या स्वरुपात महोत्सव आयोजित करता येईल या उद्देशाने आता केवळ कामगार नाट्य महोत्सव अंतिम स्पर्धा आयोजित करण्यात यावी. विभागस्तरावर आयोजित कामगार नाट्य महोत्सव प्राथमिक स्पर्धेमध्ये विविध आस्थापनांच्या संघांना सुद्धा त्यांच्या आस्थापनांच्या नावाने प्रवेश देण्यात यावा.

विभाग प्रमुखांनी त्यांच्या विभागातील सर्व केंद्रस्तर, गटस्तर व विभागस्तरीय कार्यक्रम अयोजित करण्याच्या सुचना तिमाही कार्यक्रम सुची मंजुरीपत्रकामध्ये निर्गमित करुन त्याच्या अमंलबजावणी बाबत योग्य ती कार्यवाही करावी. राज्यस्तरीय कार्यक्रमाचे आयोजनाबाबत स्वतंत्र पत्राने कळविण्यात येईल.

सदरचे परिपत्रक दिनांक ११ मे २०१५ पासून पुढील आदेश निघेपर्यंत अमंलात राहिल.

कल्याण आयुक्त

प्रत,

१) सर्व केंद्र प्रमुख
२) कामगार कल्याण अधिकारी (१८ गट कार्यालये).★★★
३) सहायक लेखा अधिकारी, सर्व विभागिय कार्यालये.
४) प्रभारी सहायक कल्याण आयुक्त,विभागिय कार्यालय, अकोला /औरंगाबाद
५) सहायक कल्याण आयुक्त,विभागिय कार्यालय,ठाणे/मुंबई/नागपूर/नाशिक/पूणे/का. क्रीडा भवन, मुंबई
६) प्रसिद्धी व जनसंपर्क अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
७) सहायक कल्याण आयुक्त, कार्यक्रम / भांडार / इमारत मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
८) लेखा व लेखा परिक्षा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई

★★★ यांनी सदरचे परिपत्रक केंद्र प्रमुखांना उपलब्ध करुन द्यावे.

# परिशिष्ट अ
## केंद्रस्तरीय कार्यक्रम

| अ.क्र | कार्यक्रमाचे नाव व स्वरुप |
|---|---|
| | **माहे एप्रिल** |
| १ | **राष्ट्रीय सप्ताह - दिनांक ६ ते १३ एप्रिल**<br>राष्ट्रीय सप्ताहाच्या कालावधीमध्ये मंडळाच्या विभाग / गट / केंद्र स्तरावरील स्वमालकिच्या इमारतीवर राष्ट्रध्वज लावण्यात यावा. |
| २ | **जनजागृती मेळावा**<br>महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना, उपक्रम व कार्यक्रम कामगार व कामगार कुटूंबियांपर्यंत प्रभावीपणे पोहचविण्यासाठी प्रत्येक केंद्रांच्या ठिकाणी माहे एप्रिल ते मार्च या कालावधीमध्ये किमान एक जनजागृती मेळाव्याचे आयोजन करावे.<br>या मेळाव्यामध्ये मोठ्या प्रमाणावर कामगार व कामगार कुटूंबियांना सहभागी करुन मंडळाच्यावतीने त्यांच्याकरिता राबविण्यात येणाऱ्या सर्व योजना, उपक्रम व कार्यक्रमाची माहिती देण्यात यावी. कामगार कल्याण अधिकारी व सहायक कल्याण आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात यावा. |
| ३ | **महिला व बेरोजगार यांच्यासाठी गृहउद्योग आणि दुय्यम व्यवसायासाठी प्रशिक्षण कार्यक्रम**<br>कामगार, कामगार कुटूंबिय महिला आणि कामगार कुटूंबातील बेरोजगार व्यक्तिंसाठी गृहउद्योग व दुय्यम व्यवसाय सुरु करण्यासाठी खालील प्रमाणे प्रशिक्षणाचे आयोजन करावे.<br>माहे एप्रिल ते मार्च या कालावधीमध्ये प्रत्येक केंद्रांवर किमान **एका** कार्यक्रमाचे आयोजन करावे. कार्यक्रमाप्रमाणे कालावधी ठरविण्यात यावा.<br>१) विक्री कला कौशल्य<br>२) गिफ्ट अर्टिकल निर्मित्ती<br>( सिरॅमिक फ्लावर पॉट, ग्लास पेंटींग, स्टेन ग्लास पेंटींग, फ्रेमिंग, पोस्टर फ्रेमिंग इत्यादी )<br>३) मोबाईल रिपेरींग<br>४) ब्युटी केअर अॅण्ड पार्लर मॅनेजमेंट<br>५) फोटोग्राफी<br>५) व्हिडीओ शुटींग<br>६) घरगुती उपकरणे दुरुस्ती ( मिक्सर, इस्त्री, गॅस, फॅन इत्यादी )<br>७) विविध प्रकारचे खाद्य पदार्थ तयार करणे<br>८) कागदी पिशवी तयार करणे<br>९) रेक्झीन, कापडी बॅग / पर्सेस बनविणे,<br>१०) इमिटेशन ज्वेलरी<br>११) खडू, मेणबत्ती, अत्तर बनविणे.<br>१२) जरीवर्क ( जरदोषी वर्क )<br>१३) गृह उद्योग आणि दुय्यम व्यवसायासाठी इतर प्रशिक्षण कार्यक्रम |
| | **माहे मे** |
| ४ | **आंतरराष्ट्रीय कामगार दिन व महाराष्ट्र दिन – दिनांक १ मे**<br>या दिनानिमित्त केंद्र स्तरावर कामगारांशी संबधित विविध विषयावर व्याख्यान / परिसंवाद आयोजित करण्यात यावे, या कार्यक्रमांकरिता विविध आस्थापनांचे व्यवस्थापक, कामगार नेते, कामगार व कामगार कुटूंबिय तसेच केंद्र सभासद यांना सहभागी करुन घेण्यात यावे. |

| | |
|---|---|
| | **माहे जुलै** |
| ५ | **शिशु मंदिर बालकांची वैद्यकीय तपासणी – माहे जुलै व डिसेंबर**<br>सर्व केंद्र प्रमुखांनी आपल्या केंद्रातील शिशु मंदिर ४० मुलांचे युनिट पूर्ण झाल्यानंतर बालरोग तज्ञ डॉक्टरांकडून वैद्यकिय तपासणी करुन घ्यावी व यामध्ये डॉक्टरांकडून जे रिपोर्ट किंवा ज्या सुचना प्राप्त होतील त्यांची माहिती संबधित पालकांना पुढील उपचारासाठी द्यावी. हा कार्यक्रम माहे जुलै व डिंसेबरमध्ये वर्षातून दोन वेळा आयोजीत करण्यात यावा. |
| | **माहे ऑगस्ट** |
| ६ | **स्वातंत्र्यदिन - १५ ऑगस्ट**<br>सर्व केंद्र स्तरावर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण करावे. ज्या केंद्र इमारतीमध्ये गट किंवा विभागिय कार्यालय आहेत त्या ठिकाणी एकत्रितपणे कार्यक्रमाचे आयोजन करावे. ध्वजारोहण करतांना ध्वजारोहणाची मुख्य आचार संहिता अमंलात आणावी. ध्वजारोहणासाठी बोलविण्यात येणाऱ्या पाहुण्यांची नावे कार्यक्रमापूर्वी वरिष्ठ कार्यालयास कळविण्यात यावे. |
| | **माहे नोव्हेंबर** |
| ७ | **कामगार कल्याण कार्याचा वर्धापन दिन - २२ नोव्हेंबर**<br>२२ नोव्हेंबर हा कामगार कल्याण कार्याचा वर्धापन दिन म्हणून सर्व केंद्रात साजरा करावा. वर्धापन दिन साजरा करताना केंद्रामध्ये लहान मुलांना गोड खाऊचे वाटप, महिलासांठी हळदी-कुंकू व महिला मेळावा तसेच युवकांसाठी कॅरम स्पर्धा/ बुध्दीबळ / टेबल टेनिस स्पर्धा अशा प्रकारची एक दिवसांची स्पर्धा आयोजित करावी. तसेच लहान मुलांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी व वेशभूषा स्पर्धा अशा स्वरूपाचे कार्यक्रम किंवा या व्यतिरिक्त विभाग प्रमुख ठरवतील अशा प्रकारचे कार्यक्रम केंद्रामध्ये साजरे करावेत या सर्व कार्यक्रमासाठी येणारा खर्च विभाग स्तरावर प्रस्ताव पाठवून मंजुरी घ्यावी. |
| | **माहे डिसेंबर** |
| ८ | **शिशु मंदिर मुलांची सहल – डिसेंबर / जानेवारी**<br>राज्यातील मंडळाच्या सर्व शिशु मंदिर मुलांकरिता वर्षातून एकदा निसर्गरम्य ठिकाणी सहलीचे आयोजन करावे.ही सहल केंद्राच्या ठिकाणापासुन १५ किलोमीटर अंतराच्या आत असावी. मुलांच्या सुरक्षिततेसाठी राज्यपरिवहन महामंडळाच्या बसेस किंवा खाजगी परंतु मान्यता प्राप्त ट्रॅव्हल एजन्सीच्या बसने नेण्यात यावी. सहलीबाबत मध्यवर्ती कार्यालयाकडुन देण्यात आलेल्या निर्देशाप्रमाणे सहलीचे आयोजन करावे. |
| ९ | **कामगार व कामगार कुटूंबियांसाठी लांब पाल्यांची सहल – डिसेंबर – फेब्रुवारी**<br>मध्यवर्ती कार्यालयांच्या परिपत्रकातील सुचनांप्रमाणे प्रत्येक केंद्रांवर माहे डिसेंबर ते फेब्रुवारी या कालावधीमध्ये कामगार व कामगार कुटूंबियांसाठी लांब पाल्यांच्या सहलीचे आयोजन करणे बंधनकारक आहे. |
| | **माहे जानेवारी** |
| १० | **प्रजासत्ताक दिन - २६ जानेवारी**<br>सर्व केंद्र स्तरावर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण करावे. ज्या केंद्र इमारतीमध्ये गट किंवा विभागिय कार्यालय आहेत त्या ठिकाणी एकत्रितपणे कार्यक्रमाचे आयोजन करावे. ध्वजारोहण करतांना ध्वजारोहणाची मुख्य आचार संहिता अमंलात आणावी. ध्वजारोहणासाठी बोलविण्यात येणाऱ्या पाहुण्यांची नावे कार्यक्रमापूर्वी वरिष्ठ कार्यालयास कळविण्यात यावे. |

## परिशिष्ट ब

## गट स्तरीय कार्यक्रम

| अ.क्र | कार्यक्रमाचे नाव व स्वरुप |
|---|---|
| | **माहे एप्रिल** |
| १ | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर जंयती – दिनांक १४ एप्रिल**<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर जंयती निमित्ताने गट स्तरावर स्थानिक सभासदांचा प्रतिसाद लक्षात घेऊन एका प्रमुख केंद्रांच्या ठिकाणी व्याख्यान /परिसंवाद किंवा विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात यावे. |
| २ | **स्पर्धा परिक्षा पुर्व प्रशिक्षण – माहे एप्रिल ते मार्च**<br>मंडळाकडे नोंदीत आस्थापनामधील कामगार व कामगार कुटुंबियांकरिता गटस्तरावर स्पर्धा पूर्व परिक्षण शिबीराचे आयोजन करावे.<br>महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या / पूर्ण झालेल्या कामगार व कामगार कुटंबियकरिता विविध स्पर्धा परिक्षांची तयारी कशी करावी. त्याकरीता असलेला अभ्यासक्रम/ स्पर्धा परिक्षेचे स्वरुप इत्यादी. बाबत माहिती प्रशिक्षणाद्वारे देऊन त्यांना स्पर्धा परिक्षां करीता तयार करण्यात यावे. मध्यवर्ती कार्यालयाकडून या प्रशिक्षणाबाबत दिलेल्या निर्देशाप्रमाणे प्रशिक्षण वर्गाचे आयोज करावे. गट प्रमुखांनी माहे एप्रिल ते मार्च या कालावधीमध्ये किमान दोन प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करावे. |
| ३ | **क्रीडा प्रशिक्षण वर्ग - माहे एप्रिल ते मार्च**<br>ज्या केंद्रामध्ये क्रीडा प्रशिक्षणाची सुविधा आहे अशा केंद्रामध्ये फक्त कामगारांच्या कुटूंबियांना जलतरण, धनुर्विद्या, टेबल टेनिस, बॅडमिंटन, कबड्डी, व्हॉलीबॉल या सारख्या खेळांचे प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात यावे.<br>कामगार कुटूंबियांना सदर खेळाच्या प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन देऊन त्यांना त्या खेळांमध्ये पारंगत होऊन त्यांच्या क्रीडा कलागुणांना प्रेरणा मिळावी व चांगले खेळाडू तयार व्हावे या उद्देशाने सदरचे प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात येत आहे. मध्यवर्ती कार्यालयाकडून या प्रशिक्षणाबाबत दिलेल्या निर्देशाप्रमाणे वर्गाचे आयोज करावे. गट प्रमुखांनी माहे एप्रिल ते मार्च या कालावधीमध्ये किमान दोन प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करावे. |
| | **माहे मे** |
| ४ | **आंतरराष्ट्रीय कामगार दिन व महाराष्ट्र दिन – दिनांक १ मे**<br>या दिनानिमित्त गट स्तरावर प्रतिसाद मिळेल अशा एका प्रमुख केंद्रावर कामगार दिनानिमित्त कामगार मेळावा आयोजित करुन कामगारांशी संबधित विविध विषयावर व्याख्यान / परिसंवाद / विविध स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. या कार्यक्रमांकरिता विविध आस्थापनांचे व्यवस्थापक, कामगार नेते, कामगार व कामगार कुटूंबिय यांना सहभागी करुन घेण्यात यावे. |
| ५ | **इयत्ता १० वी व १२ वी नंतर पुढे काय ? मार्गदर्शन शिबीर**<br>गट स्तरावरावर प्रतिसाद मिळेल अशा एका प्रमुख केंद्रावर इयत्ता १० वी व १२ वी चे निकाल लागण्यापूर्वी विद्यार्थ्यांकरिता मोठ्या स्वरुपात मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात यावे. या शिबीरात १० वी व १२ वी च्या नंतर कोणकोणते अभ्यासक्रमांच्या संधी उपलब्ध आहेत या विषयी त्या त्या क्षेत्रातील तज्ञाकडून मार्गदर्शन देण्यात यावे. या शिबीरात कामगार कुटूंबिय व केंद्र सभासद विद्यार्थ्यांना सहभागी करुन घ्यावे. |
| ६ | **रोजगार व स्वंयरोजगार शिबीर**<br>प्रत्येक गट प्रमुखांनी गट स्तरावरावर प्रतिसाद मिळेल अशा एका प्रमुख केंद्रावर रोजगार व स्वयं रोजगार प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात यावे. याकरिता जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हा रोजगार व स्वयं रोजगार कार्यालय विविध बँकाचे अधिकारी, खादी व ग्रामोद्योग मंडळ, महिला आर्थिक विकास महामंडळ या सारख्या शासकिय कार्यालयाच्या अधिकाऱ्यांना शिबीराला निमंत्रीत करुन रोजगार व स्वंय रोजगाराबाबत मार्गदर्शन करावे. या शिबीरामध्ये कामगार व कामगार कुंटूबियांना सहभागी करुन घेण्यात यावे. |

| | |
|---|---|
| ७ | **वासंतिक व्याख्यानमाला**<br>प्रत्येक गट प्रमुखांनी गट स्तरावरावर प्रतिसाद मिळेल अशा एका प्रमुख केंद्रावर वासंतिक व्याख्यानमाला आयोजित करण्यात यावी. स्पर्धात्मक युगातील समाजातील वेगवेगळे ज्वलंत विषय तसेच चालू घडामोडीवर व्याख्यानाचे विषय ठरवावे. विषयानुसार त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांना व्याख्याते म्हणून निमंत्रित करण्यात यावे. व्याख्यानमालेतील विषय निवडताना विभाग प्रमुखांशी चर्चा करुन त्यांची मान्यता घेऊनच विषय निवडावे. या व्याख्यानमालेमध्ये कामगार व कामगार कुंटूबियांना तसेच केंद्र सभासदांना सहभागी करुन घेण्यात यावे. व्याख्यानमालेचा वेळ हा सभासदांच्या सोयीनुसार शक्यतो सायं ५.०० नंतरचा ठेवण्यात यावा. |
| ८ | **व्यक्तिमत्व विकास शिबीर**<br>प्रत्येक गट प्रमुखांनी गट स्तरावरावर प्रतिसाद मिळेल अशा एका प्रमुख केंद्रावर व्यक्तिमत्व विकास शिबीर आयोजित करावे. बाल गट / युवक व युवती / प्रौढ गट अशा वयोगटांतील सभासदाकरिता शिबीर आयोजित करावे. शिबीरामध्ये त्या त्या वयोगट नुसार विषयांची निवड करुन विषयांशी संबधित तज्ञ प्रशिक्षक नेमण्यात यावे. शिबीराचा कालावधी कमीतकमी ८ दिवसांचा असावा. या शिबीरामध्ये कामगार व कामगार कुंटूबियांना सहभागी करुन घेण्यात यावे. |
| | **माहे जून** |
| ९ | **विविध आस्थापनांच्या व्यवस्थापकांकरिता चर्चासत्र - माहे जून / जुलै**<br>महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या योजना, उपक्रम व कार्यक्रम यांची माहिती कामगारांपर्यंत पोहचविण्याकरिता विविध आस्थापनांचे मुख्यव्यवस्थापक, व्यवस्थापक (मानव संसाधन), कल्याण अधिकारी, कामगार अधिकारी यांचे चर्चासत्र आयोजित करुन त्यांना माहिती देण्यात यावी. त्यामुळे मंडळाच्या कार्याबाबतची माहिती त्यांच्यामार्फत कामगार व कामगार कुटूंबियांपर्यंत पोहचण्यास मदत होईल.<br>ज्या ठिकाणी उत्तम प्रतिसाद मिळेल अशा ठिकाणी या मेळाव्याचे मोठ्या स्वरुपात आयोजन करावे. सदर चर्चासत्र विभाग प्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात यावे. |
| | **माहे जुलै** |
| १० | **महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचा वर्धापन दिन – दिनांक १ जुलै**<br>महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची स्थापना १ जुलै १९५३ रोजी झाली. त्यानिमित्ताने मंडळाचा वर्धापनदिन सर्व गट स्तरावर साजरा करण्यात यावा. ज्या ठिकाणी गट आणि विभागिय कार्यालय एकाच शहरामध्ये आहेत. त्या ठिकाणी विभागिय स्तरावर कार्यक्रमाचे आयोजन करावे. मध्यवर्ती कार्यालय, ठाणे व मुंबई विभाग यांचा एकत्रितपणे वर्धापनदिनाचा कार्यक्रम कामगार क्रीडा भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात यावा. |
| ११ | **जागतिक लोकसंख्या दिन – दिनांक ११ जुलै**<br>प्रत्येक गट प्रमुखांनी गट स्तरावरावर एका प्रमुख केंद्रावर जागतिक लोकसंख्या दिन कार्यक्रमाचे आयोजन करावे. वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी, लोकसंख्या वाढीची कारणमिमांसा व कुटूंबावर होणारा दुष्परिणाम याबाबत व्याख्यान किंवा परिसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करुन कार्यक्रमाच्या निमित्ताने जनजागृती करण्यात यावी. या प्रसंगी १ अपत्यावर किंवा २ मुलींवर शस्त्रक्रिया केलेल्या ५ कामगार जोडप्यांचा सत्कार करण्यात यावा. |
| १२ | **इयत्ता १० वी १२ वी मधील कामगार पाल्यांसाठी मार्गदर्शन व उजळणी वर्ग - माहे जुलै ते डिसेंबर**<br>इयत्ता १० वी व १२ वी मध्ये शिकणाऱ्या कामगारांच्या पाल्यांकरीता गटस्तरावर एक प्रमुख केंद्राच्या ठिकाणी मार्गदर्शन व उजळणी कार्यक्रमाचे आयोजन करावे.<br>परिक्षेचे स्वरुप, परिक्षेची तयारी कशी करावी. तसेच मुख्यतः गणित, विज्ञान व इंग्रजी या विषयाबाबत मार्गदर्शन व उजळणी वर्गाचे आयोजन करावे. जेणेकरुन सदर विषयात कामगार पाल्यांना जास्तीत-जास्त गुण मिळवुन यशस्वी होता येईल. १० वी १२ वी परिक्षेच्या पूर्वी माहे जुलै ते डिसेंबर या कालावधीमध्ये १ महिना ते २ महिने कालावधीचे किमान एक-एक उजळणी वर्गाचे आयोजन करावे. |

| | |
|---|---|
| | **माहे ऑगस्ट** |
| १३ | **खुली समरगीत स्पर्धा – दिनांक ९ ऑगस्ट ( क्रांतीदिन )**<br>गटस्तरावर खुली समरगीत स्पर्धा आयोजित करावी. या स्पर्धेमध्ये १८ वर्षावरील सभासदांना प्रवेश देण्यात यावा. स्पर्धेत भाग घेणारे ५० टक्के कलावंत कामगार व कामगार कुटूंबिय असणे आवश्यक आहे. वादकांना ही अट राहणार नाही. सदर स्पर्धेत कमीत कमी ८ संघानी भाग घेणे आवश्यक राहिल. सन २०१५-१६ या वर्षापासून ही स्पर्धा फक्त गट स्तरावरच आयोजित करण्यात यावी. |
| १४ | **कुस्ती प्रशिक्षण शिबीर**<br>ज्या गटात कुस्ती उपक्रमास प्रतिसाद मिळतो अशा ठिकाणी कामगार व कामगार कुंटुबिय सभासदांसाठी कुस्ती प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात यावे. |
| | **माहे संप्टेंबर** |
| १५ | **आरोग्य शिबीर/रक्तदान शिबीर**<br>माहे सप्टेंबर मध्ये गट स्तरावर एका प्रमुख केंद्रांच्या ठिकाणी स्थानिक आरोग्य केंद्राच्या मदतीने लहान मुले, स्त्रीया व प्रौढासाठी विविध प्रकारचे आजारा विषयी आरोग्य शिबीर आयोजित करावे. रक्तदान शिबीर घ्यावयाचे असल्यास मान्यताप्रात ट्रस्ट किंवा शासन मान्य रक्तपेढीच्या मदतीने रक्तदान शिबीर आयोजित करावे. |
| १६ | **महिला नाट्य महोत्सव**<br>माहे सप्टेंबर मध्ये प्रत्येक गट स्तरावर मध्यवर्ती कार्यालयाकडून दिलेल्या नियम व अटीनुसार महिला नाट्य महोत्सव आयोजित करावा. गटस्तरीय स्पर्धेत किमान ८ संघ असणे आवश्यक आहे. |
| | **माहे ऑक्टोबर** |
| १७ | **बाल नाट्य महोत्सव**<br>माहे ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीमध्ये प्रत्येक गट स्तरावर मध्यवर्ती कार्यालयाकडून दिलेल्या नियम व अटीनुसार बाल नाट्य महोत्सव आयोजित करावा. स्पर्धेत भाग घेणारे ५० टक्के कलावंत कामगार व कामगार कुटूंबिय असणे आवश्यक आहे. गटस्तरीय स्पर्धेत किमान ८ संघ असणे आवश्यक आहे. |
| | |
| १८ | **महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती – दिनांक २ ऑक्टोंबर**<br>प्रत्येक गट प्रमुखांनी गट स्तरावरावर प्रतिसाद मिळेल अशा **एका** प्रमुख केंद्रावर व्याख्यान किंवा परिसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करावे. |
| १९ | **कामगार पुरुष भजन स्पर्धा / महिला भजन स्पर्धा**<br>२ ऑक्टोबर महात्मा गांधी जयंती निमित्ताने २ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर या कालावधीत महात्मा गांधी जंयती सप्ताहामध्ये गट स्तरावर कामगार पुरुष भजन स्पर्धा व महिला भजन स्पर्धा आयोजिय करण्यात यावी. कामगार पुरुष भजन स्पर्धेत १००% कलावंत हे कामगार व कामगार कुटुंबीत असणे आवश्यक आहे. वादकांना ही अट राहणार नाही. महिला भजन स्पर्धा ही महिला गटासाठी असल्यामुळे खुली राहिल. गटस्तरीय स्पर्धेत किमान ८ संघ असणे आवश्यक आहे. |
| २० | **लोकनृत्य स्पर्धा**<br>माहे ऑक्टोबर मध्ये प्रत्येक गट प्रमुखांनी आपल्या गटाची लोकनृत्य स्पर्धा आयोजित करावी. मध्यवर्ती कार्यालयाकडून दिलेल्या नियम व अटीनुसार लोकनृत्य स्पर्धा आयोजित करावी. लोकनृत्य स्पर्धेमध्ये १८ वर्षावरील सभासदांना सहभागी करुन घेण्यात यावे. स्पर्धेत भाग घेणारे ५० टक्के कलावंत कामगार व कामगार कुटूंबिय असणे आवश्यक आहे. वादकांना ही अट राहणार नाही. गटस्तरीय स्पर्धेत किमान ८ संघ असणे आवश्यक आहे. सन २०१५-१६ या वर्षापासून ही स्पर्धा फक्त गट स्तरावरच आयोजित करण्यात यावी. |

| | |
|---|---|
| | **माहे नोव्हेंबर** |
| २१ | **राष्ट्रीय कौमी एकता सप्ताह – दिनांक १९ ते २५ नोव्हेंबर**<br>गटस्तरावर **एका** प्रमुख केंद्रांच्या ठिकाणी शासनाच्या निर्देशाप्रमाणे दिनांक १९ ते २५ नोव्हेंबर या कालावधीत कौमी एकता सप्ताह म्हणून सर्वत्र साजरा करण्यात यावा. मध्यवर्ती कार्यालयाचे या कार्याक्रमासंबधितचे परिपत्रक पाहावे आणि त्यानुसार कार्यक्रमाचे आयोजन करावे. |
| २२ | **शरीर सौष्ठव स्पर्धा (कामगार श्री)**<br>गटस्तरावर शरीर सौष्ठव स्पर्धेचे आयोजन करावे. जिल्हा क्रीडा अधिकारी तसेच या खेळाच्या जिल्ह्यांच्या असोसिएशनच्या सहकार्याने ही स्पर्धा आयोजित करण्यात यावी. या स्पर्धेमध्ये कामगार व कामगार कुटूंबिय यांना तसेच मंडळाच्या व्यायामशाळेमधील सभासदांना प्रवेश देण्यात यावा. |
| | **माहे डिसेंबर** |
| २३ | **गुणंवत विद्यार्थी सत्कार**<br>प्रत्येक गट स्तरावर इ. १०वी व १२वी च्या कामगार कुटूंबातील गुणवंत पाल्यांचा सत्कार आयोजित करावा. जे विद्यार्थ्यी ९० टक्कयापेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झाले असतील अशा इ.१०वी चे ३ व इ. १२ वी चे ३ असे ६ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात यावा. |
| २४ | **हुतात्मा बाबू गेनू स्मृतिदिन – दिनांक १२ डिसेंबर**<br>स्वदेशी चळवळीत हुतात्मा झालेले शहीद बाबू गेनू यांचा स्मृतिदिन १२ डिसेंबर रोजी प्रत्येक गटातील **एका** प्रमुख केंद्रावर साजरा करण्यात यावा. या निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात यावा तसेच त्यांच्या जीवनकार्यावर आधारीत व्याख्यान / परिसंवाद आयोजित करण्यात यावे. |
| २५ | **राष्ट्रीय ग्राहक सप्ताह – दिनांक २६ ते ३० डिंसेबर**<br>शासनाच्या निर्देशाप्रमाणे २६ ते ३० डिंसेबर या कालावधीमध्ये ग्राहक सप्ताहाचे आयोजन करावे. यादिवशी खालील प्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करावे.<br>२६ डिसेंबर - राष्ट्रीय ग्राहक भित्तीपत्रके<br>२७ डिंसेबर - निंबध स्पर्धा<br>२८ डिसेंबर - चर्चासत्र परिसंवाद<br>२९ डिंसेबर - चित्रकला / रांगोळी स्पर्धा<br>३० डिसेंबर - पारितोषिक वितरण समारंभ<br>वरील कार्यक्रम हे गटातील एका प्रमूख केंद्रावर घेण्यात यावे. |
| २६ | **कुस्ती स्पर्धा - माहे डिसेंबर / जानेवारी**<br>ज्या गटात प्रतिसाद असेल अशा गटाच्या ठिकाणी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे. जिल्हा क्रीडा अधिकारी तसेच या खेळाच्या जिल्ह्यांच्या असोसिएशनाच्या सहकार्याने ही स्पर्धा आयोजित करण्यात यावी. या स्पर्धेमध्ये कामगार व कामगार कुटूंबिय यांना तसेच मंडळाच्या कुस्ती आखाड्यातील सभासदांना प्रवेश देण्याय यावा. |
| | **माहे जानेवारी** |
| २७ | **स्वामी विवेकानंद जयंती ( युवा दिन ) दिनांक १२ जानेवारी**<br>प्रत्येक गट प्रमुखांनी गट स्तरावरावर एका प्रमुख केंद्राच्या ठिकाणी स्वामी विवेकानंद जयंती निमित्त युवक / युवतींचा मेळावा आयोजित करावा. या मेळाव्यामध्ये परिसंवाद, विविध स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. |

| | |
|---|---|
| २८ | **रोजगार मेळावा – जानेवारी / फेब्रुवारी**<br>कामगार पाल्यांना आर्थिकदृष्टया स्वावलंबी होण्याकरिता रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून खाजगी क्षेत्रातील विविध संधीची माहिती मिळावी व त्यांना रोजगार मिळावा या करिता गट स्तरावर रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात यावे. यासाठी जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाचे सहकार्य घेण्यात यावे.<br>ज्या खाजगी आस्थापनां मध्ये नोकरीची संधी उपलब्ध आहे अशा आस्थापनांशी संपर्क करुन माहिती मिळविण्यात यावी. तसेच ज्या कामगार पाल्यांना नोकरीची आवश्यकता आहे अशा पाल्यांची नोंदणी करण्यात यावी. या मेळाव्यात मोठ्या प्रमाणात आस्थापना व कामगार पाल्यांना सहभागी करुन घेण्यात यावे. |
| | **माहे फेब्रुवारी** |
| २९ | **कै.नारायण मेघाजी लोखंडे पुण्यतिथी दिनांक ९ फेब्रुवारी**<br>कामगार चळवळीचे आद्यप्रणेते कै.नारायण मेघाजी लोखंडे यांची पुण्यतिथी गट स्तरावर एका प्रमुख केंद्रावर साजरी करण्यात यावी. या दिवशी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात यावा तसेच त्यांच्या जिवन व कार्यावर व्याख्यान / परिसंवाद आयोजित करण्यात यावे. |
| | **माहे मार्च** |
| ३० | **जागतिक महिला दिन – दिनांक ८ मार्च**<br>जागतिक महिला दिनानिमित्ताने ८ ते १० मार्च या कालावधीमध्ये गट स्तरावर खालील प्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करावे. |

| | |
|---|---|
| **दिनांक ८ मार्च**<br>महिलांसाठी आरोग्य शिबीर | गट स्तरावरील एका प्रमुख केंद्रावर आयोजित करण्यात यावे. यामध्ये महिलांसाठी नेत्र / मधुमेह / रक्तदाब/ कँन्सर / ह्रदयरोग तपासणी |
| **दिनांक ९ मार्च**<br>स्त्री भ्रुण हत्या या विषयावर परिसंवाद | या कार्यक्रमाध्ये गट स्तरावरील एका प्रमुख केंद्रात परिसंवादाचे आयोजन करावे |
| **दिनांक १० मार्च**<br>विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या कामगार व कामगार कुंटूबिय महिलांचा सत्कार समारंभ | गट स्तरावरील एका प्रमुख केद्रावर आयोजित करण्यात यावे. या मध्ये विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या कामगार व कामगार कुंटूबिय अशा कमीत कमी पाच व जास्तीतजास्त आठ महिलांना शाल व श्रीफळ तसेच स्मृतिचिन्ह देवून महिलांचा सत्कार करण्यात यावा. |

| | |
|---|---|
| ३१ | **हस्तकला प्रदर्शन**<br>मंडळाच्या ज्या केंद्रामध्ये हस्तकला वर्ग सुरु आहेत अशा ठिकाणच्या महिलांना प्रोसाहन देण्यासाठी यासाठी त्यांनी तयार केलेल्या विविध वस्तुचे प्रदर्शन गट स्तरावर एका प्रमुख केंद्रांच्या ठिकाणी आयोजित करण्यात यावे. |

## परिशिष्ट क
## विभागस्तरीय कार्यक्रम

| अ.क्र | कार्यक्रमाचे नाव व स्वरुप |
|---|---|
| १ | **नाट्य प्रशिक्षण शिबीर – माहे ऑक्टोंबर**<br>मंडळाच्या महाराष्ट्रातील सर्व विभागिय कार्यालयाच्या स्तरावर कामगार व कामगार कुटूंबियांकरिता नाट्य प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात यावे. या शिबीरात ख्यातनाम नाटककार, दिग्दर्शक, अभिनेते, तेपथ्यकार, प्रकाशयोजनाकार, संगीतकार आदिंच्यासमवेत जेष्ठनाट्य समिक्षक यांचे मार्गदर्शन नवोदित कलावंताना उपलब्ध करुन द्यावे. विभाग स्तरावर आयोजित होणाऱ्या प्राथमिक नाट्य महोत्सवातील कलावंताना या शिबीरात प्राध्यान्य द्यावे. |
| २ | **कामगार नाट्य महोत्सव – प्राथमिक स्पर्धा - माहे नोव्हेंबर / डिसेंबर**<br>राज्यस्तरीय कामगार नाट्य महोत्सव आणि औद्योगिक व व्यवसायिक कामगारांसाठी नाट्य महोत्सव स्वतंत्रपणे आयोजित करण्यात येत होता. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षापासून दोन महोत्सव आयोजित न करता एकच महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे.<br>विभाग प्रमुखांनी विभागस्तरावर प्राथमिक नाट्य महोत्सव आयोजित करताना कामगार कल्याण केंद्राच्या संघासोबत महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत येणाऱ्या विविध आस्थापनांच्या संघाना त्यांच्या आस्थापनांच्या नावाने प्रवेश देण्यात यावा. |
| ३ | **रंगभूमी दिन – दिनांक ५ नोव्हेंबर**<br>५ नोव्हेंबर हा रंगभूमी दिन मंडळाच्या सर्व विभागिय स्तरावर साजरा करण्यात यावा. अखिल भारतीय नाट्य परिषदेने गौरविलेल्या कामगार रंगभूमीच्या नाट्यकर्मीचा व कामगार कलावंताचा मंडळाच्यावतीने सत्कार करण्यात यावा. |

**परिशिष्ट ड**

**राज्यस्तरीय कार्यक्रम**

| अ.क्र | कार्यक्रमाचे नाव व स्वरुप |
|---|---|
| १ | **दशावतारी नाट्य महोत्सव – माहे एप्रिल / मे**<br>कोकणातील सांस्कृतिक मुल्ये जपण्याचे काम दशावतारी नाट्य महोत्सवाच्या माध्यमातून गेली अनेक वर्षे अविरत सुरु आहे. हा महोत्सव दरवर्षी माहे एप्रिल – मे या कालावधीमध्ये ठाणे विभागातंर्गत चिपळूण गटामध्ये आयोजित करण्यात यावा. |
| २ | **कामगार नाट्य महोत्सव – अंतिम स्पर्धा माहे जानेवारी**<br>कामगार नाट्य महोत्सव अंतिम स्पर्धेमध्ये विभागीय स्तरावरील प्राथमिक स्पर्धेमध्ये प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाच्या संघाना ( सहभागी संघाच्या संख्येनुसार) प्रवेश देण्यात यावा. |
| ३ | **राज्यस्तरीय कामगार भजन स्पर्धा - माहे २९ व ३० जानेवारी ( हुतात्मा दिन )**<br>महाराष्ट्रातील मंडळाच्या गट स्तरावर महिला व पुरुष विभागांकरिता स्वतंत्रपणे प्राथमिक स्पर्धा आयोजित केली जाते. राज्यस्तरीय भजन स्पर्धेमध्ये गट स्तरीय स्पर्धेत प्रथम पारितोषिक प्राप्त संघाना प्रवेश देण्यात यावा. |
| ४ | **औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी कबड्डी स्पर्धा - माहे डिसेंबर – फेब्रुवारी**<br>मंडळाच्या वतीने औद्योगिक व व्यावसायिक पुरुष कामगारांसाठी कबड्डी स्पर्धेचे १९९४ पासून व महिलांसाठी खुल्या कबड्डी स्पर्धेचे सन २००० पासून प्रतिवर्षी आयोजन सुरु करण्यात आले आहे. ही स्पर्धा दरवर्षी प्रमाणे मुंबई येथे घेण्यात यावी. जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई शहर कबड्डी असोसिएशन व महाराष्ट्र राज्य कबड्डी असोशिएशनच्या सहकार्याने ही स्पर्धा आयोजित करण्यात यावी. |
| ५ | **राज्यस्तरीय  कामगार केसरी व कुमार केसरी कुस्ती स्पर्धा - माहे फेब्रुवारी**<br>औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी राज्यस्तरीय कामगार केसरी व कुमार केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे. स्पर्धकांची प्रवेशिका आस्थापणेमार्फत स्विकारण्यात यावी. सदर स्पर्धा जिल्हा क्रीडा अधिकारी, संबधित जिल्ह्याच्या तालिम संघाच्या सहकार्याने आयोजित करण्यात यावी. |
| ६ | **कामगार साहित्य संमेलन –  माहे डिसेंबर – फेब्रुवारी**<br>साहित्यविषयक कलागुण जोपासणाऱ्या नवोदित कामगार लेखक / कवी साहित्यिक आणि सर्व साधारण कामगार वर्ग यांच्यासाठी हक्काचे व्यासपिठ म्हणून सन १९९२ पासून कामगार साहित्य संमेलन हा उपक्रम मंडळाने सुरु केलेला आहे. |

वरील प्रमाणे सर्व राज्यस्तरीय कार्यक्रमाचे आयोजनाबाबत कालावधी, स्थळ इत्यादीबाबत स्वतंत्रपणे परिपत्रक निर्गमित करण्यात येईल.